## थोडक्यात...

### उमरे ग्रुप ग्रामपंचायतच्या सरपंचपदी सचिन पाटील बिनविरोध



**मालखेडे । प्रतिनिधी**

मालखेडे –उमरे ग्रुप ग्रामपंचायत च्या सरपंच पदी उमरे येथील सचिन विठ्ठल पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तत्कालीन सरपंच सौ. प्रतिभा ईश्वर पाटील यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्यामुळे काल चार सप्टेंबर रोजी सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. सचिन पाटील यांचा एकमेव अर्ज सरपंच पदासाठी आल्याने निवडणूक अधिकाऱ्यांनी पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य विलास दगडू पाटील, सौ. सुषमा दीपक पाटील, प्रतिभा पाटील, सचिन पाटील उपस्थित होते. एकूण सात सदस्यांपैकी सौ. पुष्पाबाई समाधान पाटील, दशरथ आधार अहिरे, व सौ. सपना संजय भील हे तीन सदस्य अनुउपस्थित राहिले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आर. के. पटाईत व ग्रामपंचायत अधिकारी एम. बी. महाजन यांनी काम पाहिले. सचिन पाटील यांचे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील व मित्र मंडळी यांनी अभिनंदन केले आहे..

### बोरी धरणातील पाण्यातून - कंकराज ल. पा. तलाव भरला १००%



**पारोळा । प्रतिनिधी**

तालुक्यातील तामसवाडी येथील बोरी नदीवरील बोरी मध्यम प्रकल्प हा पूर्ण भरला आहे. त्याच्या ओव्हरफ्लो मधून तालुक्यातीलच कंकराज लघु पाट तलावाचे पुनर्भरण होऊन कंकराज ल. पा. तलाव शंभर टक्के भरून ओव्हरफ्लो होऊ लागला आहे . पारोळा शहरासह असंख्य गावांची तहान भागवणारे बोरी धरण हे गेल्या दोन दिवसांपूर्वी १००% टक्के भरले आहे. त्यातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्या विसर्ग पाण्यातून कंकराज धरणाचे पुनर्भरण झाले असून. यामुळे शेतकरी वर्ग आनंदित झाला असून भविष्यात शेतीसाठी सदर धरणाचे पाणी हे उपयुक्त ठरणार असल्याचे माजी सरपंच प्रेमानंद पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी सांगून आनंद व्यक्त केला आहे. कंकराज लघुपाट तलावात तीन गावांच्या पाणीपुरवठा योजनेच्या विहिरी आहेत.

### भरपावसात गरीब मजुराचे घर कोसळल्याने संसार उघड्यावर, मदतीची गरज

**अमळनेर । प्रतिनिधी**



शहरातील मिल चाळ परिसरात हात गाडीवर कुल्फी व भाजीपाला विक्री करणारे श्रीरंग सातपुते यांच्या घराचे गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसाने घराचे छत कोसळून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. संध्याकाळच्या गणपती च्या आरतीच्या वेळेसच ही घटना घडली सुदैवाने यात सातपुते हे बचावले आहेत.या घटनेस आठ दिवस होऊनही प्रशासनाकडून कोणतीही मदत झालेली नाही.मजदूरी करून आपले पालन पोषण करीत असताना संततधार पावसात डोक्यावर छत नसल्याने सातपुते हे हवालदिल झाले असून शहरातील दानशूर व्यक्तींनी त्यांना मदतीचा हात द्यावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### उदयनगर नामकरणासाठी ग्रा.पं.कडून उदासीनता

**अमळनेर । वार्ताहर ।** डांगर बुद्रूक गावाचे नाव उदयनगर करण्याबाबत शासनाने मे महिन्यात राजपत्र प्रसिद्ध करूनही ग्रामपंचायतींचे डांगर नाव बदलण्यात आलेले नाही किंवा शासन दप्तरी बदल झालेला नाही. केंद्राच्या गृहमंत्रालयाने डांगर बुद्रूक गावचे उदयनगर नामकरण करण्यास परवानगी दिली. तीन महिने उलटूनही नामकरण झालेले नाही. तहसीलदारांनी विभागांना गॅझेट सह नावात बदल करण्याचे पत्र दिले आहे. मात्र, अद्यापही कुठेच कार्यवाही झालेली नाही. संबंधिताना आदेश देऊन कार्यवाहीची अंमलबजावणी केली जाईल. असे एन.आर. पाटील गटविकास अधिकारी पं. स. यांनी सांगितले.

## लोकसभा प्रमुख नंदकिशोर महाजन यांचा अभीष्टचिंतन सोहळा उत्साहात संपन्न



तांदलवाडी, ता. रावेर । वार्ताहर

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष, जिल्हा बँकेचे माजी संचालक तसेच लोकसभा निवडणूक प्रमुख नंदकिशोर महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवारातर्फे अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. महाजन यांच्यावर वाढदिवसाच्या शुभेच्छांचा वर्षाव झाला. राजकीय जीवनात सेवा व समर्पणाची भावना जपत हाती घेतलेले कार्य निष्ठेने पुढे नेले आहे आणि ते पुढेही चालू राहील. जनतेचा विश्वास आणि अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन नंदकिशोर महाजन यांनी यावेळी केले. यावेळी वाढदिवसानिमित्ताने निंबोल येथील सेवा समर्पण संस्थेचे योगेश पाटील, जगदीश पाटील, रुपेश पाटील व मयूर पाटील यांनी शुभेच्छा दिल्या

# कळमसरे येथे अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे नुकसान

## पंचनामा करण्याची मागणी : झालेल्या नुकसानीचे आठवडा उलटूनही पंचनामे नाहीत

**अमळनेर । प्रतिनिधी**



कळमसरे सह परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे गावांमध्ये आणि शेतीत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी ता. ३१ ऑगस्ट रोजी तालुक्यातील वासरे,कळमसरे गावांना भेट दिली होती. त्यांनी पूरग्रस्त भागांची पाहणी करीत शेतकऱ्यांशी संवादही साधला होता. एक आठवडा उलटला मात्र अजूनही शेती पिकांचा पंचनामा झाला नसल्याने तीव्र नाराजी दिसून येत आहे. मीनल करणवाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ पूरग्रस्त घरे आणि शेतीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले की, पुढील दोन दिवस अजून पावसाचे वातावरण असल्याने, पाऊस थांबल्यानंतर शेतीचे देखील पंचनामे होतील. त्यामुळे शेतकरी बांधवांनी अजिबात चिंता करण्याची गरज नाही. शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले होते. या पाहणी दौऱ्याच्या वेळी तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, गटविकास अधिकारी एन. आर. पाटील उपस्थित होते. कळमसरे गावामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याने नाराजीचा सूर आहे. लोकप्रतिनिधी यांनी नुसत्या भेटी देऊन कोरड्या सांत्वन केले आहे. मात्र जबाबदार अधिकार्यांना पंचनामा करण्याचे आदेश देणे गरजेचे असताना अजून कुठलीच ठोस कार्यवाही झालेली नाही.सबंधित अधिकारी एकमेकांवरती ढकलाढकली करीत असून यात शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. एकीकडे शेतकरी अडचणीत असताना तालुका कृषी विभाग व तालुका महसूल यांच्याकडून चालढकल होत असल्याने लोकप्रतिनिधी लक्ष घालतील का? असाही प्रश्न उपस्थित झाला आहे.

**पंचनाम्याची मागणी**

अतिवृष्टीमुळे पंचनामा करण्याची मागणी करण्यात येत आहे. शासनाने पंचनामा करण्यात येतील, असे सांगितले जात असले तरी पंचनामे होतील यासाठी शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधी, प्रशासन यांची वाट पाहिली जात आहे. ५० टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले असूनही तहसीलदार रुपेश कुमार सुराणा यांनी सांगितले आहेत की, पंचनामा सरसकट होणार नाहीत. कळमसरेत अतिवृष्टी झालेली असताना प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

कळमसरे गावात शेतकऱ्यांनी कृषी सहाय्यक अजय पवार यांना झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी संपर्क केला असता त्यांनी मला वेळ मिळेल तेव्हा मीं पंचनामा करण्यासाठी येईल असे सांगितल्याने संताप व्यक्त होत आहे.

## कर्जाणेत आदिवासी बांधवांचा पारंपरिक नवाय सण जल्लोषात साजरा



चोपडा । प्रतिनिधी

आदिवासी सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या कर्जाणे गावात पारंपारिक नवाय सण साजरा करण्यात आला. आदिवासी प्राकृतिक ऋतू नुसार धरती मातेत पेरणी करितो आणि चार महिन्या नंतर जे पीक धान्य उगवत जसे, त्यात हंगामात चवळी, भात, काकळी, मक्का आदी शेतीमालाचे उत्पादन घरात येते आणि तेच शिजवून प्रथम प्राकृतीला देवाची पूजाअर्चा केल्यानंतर नवैद्य देतो त्यानंतर जेवण करतो.

रात्री बबलू बारेला याच्या नियोजनात रात्री दोनशे ते तीनशे लोकांनी मिळून गावात जल्लोषात,पारंपरिक वेशभूषेत, आदिवासी गाण्यांवर गरबा नृत्य सादर करण्यात येऊन सांस्कृतिक कार्यक्रमांनी नवाय सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच नवाय सणाच्या दिवशी रात्रभर महिला व पुरुषांनी नाचत कुदत मनमुराद आनंद लुटला. आदिवासींची ओळख ही कोणा जाती धर्मावरून नाही तर ती सण,रूढी, परंपरा, प्रथा, वेशभुषा व रीती रिवाजा वरून त्याची ओळख होत असते.या प्रसंगी उपसरपंच प्रमोद बारेला, बबलू बारेला, कालूसिंग बारेला, राकेश बारेला, हसरत बारेला, राजकुमार बारेला, बाळू बारेला, प्रदीप बारेला, संजय बारेला, रामजी बारेला, राम बारेला, अनिल बारेला यांच्यासह आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निंभोरा येथे रस्ता दुरुस्तीचे काम सुरू, आमदारांनी संबंधितांना खडसावले

**निंभोरा बु. ता. रावेर । वार्ताहर**



येथील बस स्टँड ते स्टेशनदरम्यान महायुतीच्या माध्यमातून मुक्ताईनगर चे आमदार चंद्रकांत पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने एक ते दीड वर्षांपूर्वी अंदाजे दोन कोटी रुपये मंजूर असलेल्या या रस्त्याचे काम सुरू झाले होते मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे हे काम बंद झाले असता पुन्हा काम सुरू करण्यासाठी रावेर यावल तालुक्याचे आमदार अमोल जावळे यांनी वर्तमानपत्रांच्या वृत्तांची दखल घेत व ग्रामस्थांची गैरसोय पाहता तातडीने बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून त्यांना रस्त्याचे काम पुन्हा लागलीच सुरू करावे असे निर्देश दिले असता सदरील काम दि.५ रोजी सुरू झाले व गणेश मिरवणुकीची मार्ग काही प्रमाणात सुखर झाला. वाहनधारकांची व पायी चालणाऱ्यांसाठी समांतर रस्ते व पर्यायी रस्त्याची व्यवस्था ही केली. रस्त्याचे काम लवकरच सुरू व्हावे यासाठी निंभोरा येथील राष्ट्रवादीचे सुनील कोंडे यांनी लाक्षणिक उपोषणचा इशाराही दिला होता. देशदूत वृत्तपत्राची पत्राची घेतली दखल वेळोवेळी वाहनधारकांची अडचण पाहता दैनिक देशदूत वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्ध झाल्यामुळे याची दखल घेत लोकप्रतिनिधी यांनी रस्त्याचे काम करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू करण्यात आली आहे गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पूर्वसंध्येला रस्ते दुरुस्ती करून वाहनधारकांसह ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

### पहूर येथे राष्ट्रीय महामार्गाचे काम रेंगाळले राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण सुस्त, नागरिक त्रस्त



**पहूर, ता. जामनेर । वार्ताहर**

जळगाव–छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावरील पहूर येथे वाघूर नदीवरील पुलाचे काम अद्यापही अपूर्ण आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंच्या साईड पट्ट्या, सुरक्षा कठडे तसेच पादचारी पुलाचे काम अजूनही पूर्ण झालेले नाही. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ढिलाईमुळे नागरिकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. शनि महाराज मंदिरासमोरील त्रिफुली हे ठिकाण धोकादायक वळण बनले असून येथे वारंवार अपघात घडत आहेत. तरीदेखील स्थानिक प्रशासन याकडे गांभीर्याने पाहताना दिसत नाही. हे काम पूर्ण कधी होणार? राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अजून किती जिवांचा बळी जाण्याची वाट पाहत आहे? असा संतप्त सवाल सूज्ञ नागरिक करत आहेत.

### चाळीसगावात गुटख्यासह सात लाखांचा मुद्देमाल पकडला

**चाळीसगाव । प्रतिनिधी।** शासनाने प्रतिबंधीत केलेल्या गुटख्यासह अन्न पदार्थावर चाळीसगांव शहर पोलीसांकडुन कारवाई करण्यात आली आहे. यात लाखो रुपयांच्या गुटख्यासह एकूण ६ लाख ८३ हजार २४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी चाळीसगाव पोलीस स्टेशनला गुन्हां दाखल करण्यात आला आहे. शहरातील रेखा पेट्रोलपंपासमोर नागद रोड येथे एक संशयित मालवाहु टेम्पो क्र ६६५२ हीस थांबवून त्यातील मालाची खात्री केली असता, त्यात काही सुगंधित पान मसाला, कुरकुरे, पोंगा पंडित असा माल असा एकूण ६ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल मिळून आला. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. महेश्वर रेड्डी पोलीस अधिक्षक, अपर अधीक्षक कविता नेरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड यांच्या मार्गदर्शन व सूचनेप्रमाणे अमितकुमार मनेळ, संदीप घुले, पोहेकों योगेश मांडोळे, पोहेकों योगेश बेलदार, पोहेकॉ राकेश पाटील, पोना नितीन आगोणे, पोकों निलेश पाटील, पोकों ज्ञानेश्वर पाटोळे अशांनी केली आहे. पंचनामा शरद मधुकर पवार, कैलास पाटील यांनी केला.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना, बँका, वित्तीय संस्था यांना माझे पक्षकार उज्वला शंकर सुतार रा. निंभोरा बु. ता. रावेर जि.जळगाव यांनी दिलेल्या हक्क व अधिकारांन्वये या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, १) मिळकतीचे वर्णन मौजे निंभोरा बु. ता. रावेर जि.जळगाव शिवारातील सि.स. न. ७९० याचा तलाठी दप्तरी गट नं. ७९६/३/८ क्षेत्रफळ ११२.०० चौ.मि. (पश्चिमेकडील) एवढ्या बखळ जागेची सौदा पावती सदर मिळकतीचे मालक श्री. छगन श्रीराम नेहते वगैरे यांनी र.रु. १५०००००/- (पंधरा लाख मात्र) ला उज्वला शंकर सुतार यांच्याशी र.रु. २०००००/- (दोन लाख) शाई बयाना घेऊन केलेली आहे. परंतु छगन नेहते वगैरे ठरलेल्या सौदा पावतीनुसार न वागल्याने त्यांना नोटीस पाठवून व्यवहार पूर्ण करणेस सांगून सुद्धा ते नोटिसीप्रमाणे वागले नाहीत व सदरचे मिळकतीचे खरेदी खत नोंदवून दिले नाही म्हणून त्यांचे विरुद्ध मे. भुसावळ येथील दिवाणी कोर्टात दावा दाखल केलेला असून सदर दाव्याचा नं.२६/२०२३ असा असून या दाव्यात मे. कोर्टाने जैसे थे (Status Quo) चा आदेश पारित केलेला आहे. त्यामुळे सदरच्या आदेशामुळे हि संपती कायदेशीररित्या कोणासही खरेदी वा विक्री करता येणार नाही किंवा देता येणार नाही सदर संपती हि न्यायालयाने गोठवल्यामुळे त्या संबंधी व्यवहार हा बेकायदेशीर राहील. २) छगन नेहेते यांनी सदर मिळकतीतील इतर हक्कदारांचे हक्कसोड पत्र करून घेऊन सदरची मिळकत आपल्या नावे केलेली आहे व छगन नेहते हे आमचा हक्क डावलून इतर कोणासही सदर मिळकत विकण्याच्या तयारीत आहेत तसेच सदर मिळकती संबंधी वाद हा न्यायालयात दाखल असून तो न्यायप्रविष्ट आहे म्हणून सदर मिळकती संबंधी सौदा पावतीकरार, खरेदी विक्री, बक्षीस, दान, गहाण, मोबदला खत, मुख्त्यार पत्र, मृत्यूपत्र, व इतर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये व केल्यास तो बेकायदेशीर असेल व तो जाहीर नोटीस देणार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. हि जाहीर नोटीस दिली असे.

सही/- अॅड. उल्हास एस.पाटील मुक्ताईनगर, जि.जळगाव

सही/- जाहीर नोटीस प्रसिध्द करणार उज्वला शंकर सुतार

## चाळीसगाव ग्रामीण पोलिसांनी फरार आरोपीच्या मुसक्या आवळल्या

**चाळीसगाव । प्रतिनिधी**



चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशन कडील गुन्हे शोध पथकाने नागपुर शहर येथील हिंगणा पो स्टे येथील अप क्र. ३६७/२०२५ कलम २६२ भा. न्या.स. मधील फरार आरोपीतास शिताफिने ताब्यात घेवुन नागपुर शहर येथील हिंगणा पो स्टे पोलीसांच्या ताब्यात दिले आहे. पोलिसांच्या या कामगिरीचे कौतूक होत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दिनांक ३० ऑगस्ट रोजी हिंगणा पो.स्टे.नागपूर शहर येथील गुन्ह्यातील पोलीस कस्टडी रिमांडमधील आरोपी गणेश भिकन गोसावी (वय २०), रा. विखरण, ता. एरंडोल, जि. जळगाव हा वैद्यकीय तपासणी साठी त्यास पोलीस अंमलदार घेऽन जात असतांना, पोलिसांच्या रखवालीतून पळून गेला होता. त्याबाबत हिंगणा पो.स्टे. नागपूर शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील पाहीजे असलेला आरोपी याची गोपनिय माहिती काढली असता, आरोपी हा डोण, ता. चाळीसगाव येथे त्याचा मावस भाऊ याच्याकडे आला असल्याची माहीती मिळाली. त्यावरुन पोलीसांनी सापळा रचून नमूद आरोपी यास शिताफीने ताब्यात घेऊन हिंगणा पो.स्टे. नागपूर शहर यांचे ताब्यात दिले आहे.

ही कारवाई मा. महेश्वर रेड्डी सो, पोलीस अधिक्षक जळगाव, कविता नेरकर (पवार), अप्पर पोलीस अधिक्षक चाळीसगाव, विजयकुमार ठाकुरवाड उपविभागीय पोलीस अधिक्षक चाळीसगाव भाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, शशिकांत पाटील यांचे नेतृत्वाखाली पोउनि. राहुल राजपुत, सफौ युवराज नाईक, पोहेकॉ संदिप पाटील, पोहेकॉ औंकार सुतार, पोकॉ विजय पाटील, पोकों सुनिल पाटील यांनी केली आहे.

**नागरिकांना आवाहन–**

ग्रामीण पो.स्टे. हद्दीतील नागरिकांनी आपले गावात परीसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घ्यावेत. तसेच दिवसा किंवा रात्री कोणी संशयित इसम आपले परिसरात येत जात असेल तर चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशन दुरध्वनी क्र. ०२५८९-२२५०३३ तसेच डायल- ११२ यावर तत्काळ कळविणेबाबत चाळीसगाव ग्रामीण पोलिसांनी आवाहन केले आहे.

### गंगापुरी-खापरखेडा परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

**अमळनेर । प्रतिनिधी**

गंगापुरी–खापरखेडा परिसरात बिबट्याचे दर्शन झाल्याने गावकऱ्यांत मोठी दहशत पसरली आहे. यावेळी खापरखेडा येथील ज्ञानेश्वर नीलकंठ साळवे यांच्या डोळ्यांसमोरच त्यांच्या मालकीची बकरी बिबट्याने पळवून नेली. घटनेनंतर ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतमजूरांनी शेतात कामाला जाण्यास नकार दिला असून शेतकरी देखील शेतात जायला कचरू लागले आहेत. यामळे शेतीकामांवर परिणाम होत आहे.

## वसंतवाडी येथील शेतकऱ्याची विषारी औषध घेऊन आत्महत्या

**पारोळा । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील वसंतवाडी येथील एका शेतकऱ्याने त्याच्या स्वतः च्या शेतात विषारी औषध सेवन करून आत्महत्या केल्याची घटना नुकतीच घडली.

याबाबत पारोळा पोलीस ठाण्यात अनिल लाला पवार रा वसतवाडी यांनी पारोळा पोलीस ठाण्यात खबर दिली की गुलाब बाळु वंजारी रा. वसंतवाडी हे नेहमीप्रमाणे स्वताचे शेतात काम करायला जायचे तेव्हा बाजुच्या शेतामध्ये फवारणी करण्यासाठी आलेला शंभु भारमल पवार यानी फोन करुन सांगीतले की तुमच्या काकानी शेतात काहीतरी विषारी औषध प्राशन केले आहे. तेव्हा मी व त्याचा मुलगा किरण यानी मिळून त्यांना ग्रामीण रुग्णालय येथे खाजगी वाहनाने प्राथमिक उपचाराकामी दाखल केले.त्यांची प्रकृती जास्त गंभीर असल्याने त्यांना हिरे मेडीकल कॉलेज धुळे येथे उपचारार्थ दाखल केले. उपचार सुरु असताना दि. ४ रोजी डॉं श्रध्दा पटेल यानी गुलाब बाळु वंजारी यास तपासुन मयत घोषीत केले. याबाबत पारोळा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

SHRIRAM Finance

**श्रीराम फायनान्स लिमिटेड**

**CIN No-** L65191TN1979PLC007874

**नोंदणीकृत कार्यालय :** श्री टॉवर, प्लॉट नं. १४ए, दक्षिण भाग, औद्योगिक वसाहत, गुंडी, चेन्नई-६०००३२

**प्रशासकीय कार्यालय :** ६ वा मजला (लेव्हल २), इमारत क्र. क्यू २, औरम क्यू पार्क, जीईएन ४/१, टीटीसी, ठाणे-बेलापूर रोड, घणसोली, नवी मुंबई-४०० ७१०

**सुवर्ण कर्ज लिलाव सूचना**

खालील नमूद कर्जदारांना त्यांनी श्रीराम फायनान्स लि. (एसएफएल) कडून घेतलेल्या सुवर्ण अलंकारांच्या समक्ष कर्जाची ("सुविधा") त्यांची थकबाकी अदा करण्यासाठी सूचना वितरित करण्यात आली आहे. कर्जदार त्यांची सदर सुविधेंतर्गतची थकबाकी अदा करण्यास असमर्थ राहिल्यामुळे आम्ही तारण सुवर्ण अलंकारांचा **१७/०९/२०२५** (लिलावाची तारीख) रोजी लिलाव आयोजित करणार आहोत. सदर लिलावामधून काही अतिरिक्त रक्कम वसूल करण्यात आल्यास संबंधित कर्जदाराला ती परत करण्यात येईल आणि लिलावापश्चात त्यामध्ये तूट असल्यास, शिल्लक रक्कम योग्य कायदेशीर प्रक्रियेद्वारे कर्जदाराकडून वसूल करण्यात येईल. एसएफएलला कोणतीही पूर्वसूचना दिल्याविना खालीलपैकी कोणतेही खाते लिलावामधून काढून टाकण्याचा अधिकार आहे. काही अनपेक्षित घटना घडल्यास, एसएफएलने पूर्वसूचना न देता लिलावाची तारीख बदलण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

| पार्टीचे नाव | पार्टीचे नाव | पार्टीचे नाव |
|---|---|---|
| आकाश किसन रणधीर | मंगेश बाळासाहेब पाटील | रेखा एकनाथ राठोड |
| भूषण रमेश वाघ | मनोज राधेश्याम पाटील | सुनंदा दिलीप सुर्यवंशी |
| चुनीलाल ज्योतीलाल चव्हाण | मोहम्मद खालिद शाह समीउल्ला शाह | विजय चिंदा परदेशी |
| गोपाळ संजय पाटील | नंदकिशोर एकनाथ भामरे | |

**वरील सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव पुढील पत्त्यावर होईल : श्रीराम फायनान्स लिमिटेड, १-६, ए विंग, पहिला मजला, विठ्ठल शॉपिंग सेंटर, ११९ जय नगर, जळगाव पिन कोड - ४२५००१ - लिलावाची वेळ: दुपारी १२.०० वाजता.**

वेळेच्या मर्यादेमुळे लिलाव त्याच दिवशी पूर्ण न झाल्यास सदर लिलाव लगतच्या कामकाजाच्या दिवशी समान वेळेला आणि अटींवर पुढे चालू राहील, याची कृपया नोंद घ्यावी. ग्राहकाचे निधन झाले असल्यास लिलावासंबंधित सर्व अटी त्याच्या / तिच्या कायदेशीर वारसांना लागू राहतील.

**अधिक माहिती, अटी व शर्तीसाठी आणि लिलावामध्ये भाग घेण्याकरिता नोंदणी प्राप्त करण्यासाठी इच्छुक खरेदीदारांनी श्री. महेश गायकवाड (७२०८४१५१९५)/श्री. रोशन जुईकर (९९६७२००५७२) यांना संपर्क करावा.**

दिनांक : ०६/०९/२०२५
स्थळ : जळगाव

सही/-
श्रीराम ऑटोमॉल इंडिया लिमिटेड
अधिमंडळ मान्यताप्राप्त लिलावकर्ते
श्रीराम फायनान्स लि. करिता